RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


LATUR लातूर | वर्ष ३४ वे | अंक १५७ वा मंगळवार, दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) | पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 | पृष्ठे – ६ | मो:९४२२४७२५०२ | किंमत १ रुपया

## नेपाळमधील आंदोलनाला हिंसक वळण; राष्ट्रपती, गृहमंत्री आणि परराष्ट्रमंत्र्यांची घरे जमावाने जाळली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये सरकारविरोधी हिंसक निदर्शने दुसऱ्या दिवशीही सुरू आहेत. काठमांडूसह अनेक शहरांमध्ये तरुण आंदोलकांनी तोडफोड आणि जाळपोळ केली. आंदोलकांनी राष्ट्रपतींच्या खासगी निवासस्थानावर ताबा मिळवून, ते पेटवून दिले आहे. सोमवारी गृहमंत्री पदाचा राजीनामा देणारे रमेश लेखक, परराष्ट्र मंत्री डॉ. आरजू राणा देउबा, दळणवळण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग आणि ऊर्जा मंत्री दीपक खड्का यांच्या घरांचीही तोडफोड करून जाळपोळ करण्यात आली आहे. आंदोलकांनी रस्त्यांवरील बॅरिकेड्स तोडले असून, ते पुन्हा एकदा संसद भवनाकडे सरकत आहेत.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी नेपाळी काँग्रेस पार्टीच्या ऑफिसला देखील आग लावली. याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.

या निदर्शनांनंतर उपमुख्यमंत्री प्रकाश मान सिंह यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आपापल्या पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. सोमवारी गृहमंत्री



रमेश लेखक यांनी राजीनामा दिल्यानंतर, मंगळवारी कृषी मंत्री रामनाथ अधिकारी आणि आरोग्य मंत्री प्रदीप पौडेल यांच्यासह नेपाळी काँग्रेसच्या सर्व नेत्यांनीही राजीनामे दिले आहेत. पीपल्स सोशलिस्ट पार्टीचे नेते आणि पाणीपुरवठा मंत्री प्रदीप यादव यांनीही राजीनामा दिला आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग यांनी सोमवारी पंतप्रधान ओली राजीनामा देणार नाहीत, असे म्हटले होते. मात्र, नेपाळमधील सत्ताधारी आघाडी धोक्यात आल्याचे दिसत आहे. त्यामुळे ओली यांनी आज संध्याकाळी ६ वाजता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. काल राजधानी आणि देशाच्या विविध भागांत झालेल्या निदर्शनांमुळे आणि त्यानंतरच्या घटनांमुळे मी व्यथित आहे, असे ओली यांनी म्हटले आहे. कोणत्याही प्रकारची हिंसा राष्ट्रहिताची नाही आणि अशा समस्यांवर केवळ शांततापूर्ण मार्गाने आणि संवादातूनच तोडगा निघू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

सत्ताधारी आघाडीतील नेपाळी काँग्रेसने आपल्या सर्व मंत्र्यांना राजीनामा देण्याचे आदेश दिले आहेत. पक्षाचे प्रमुख आणि सरकारमध्ये उपपंतप्रधान असलेल्या प्रकाश मान सिंह, परराष्ट्र मंत्री आरजू राणा देउबा, क्रीडा मंत्री तेजू लाल चौधरी, कायदा मंत्री अजय चौरसिया, ऊर्जा मंत्री दीपक खड्का, वनीकरण मंत्री ऐन बहादुर शाही, आरोग्य मंत्री प्रदीप पौडेल, कृषी मंत्री रामनाथ अधिकारी आणि पर्यटन मंत्री बद्री पांडे यांनी आपापल्या पदांचे राजीनामे दिले आहेत.

## मुंबईत हाय अलर्ट: नौदल अधिकाऱ्याच्या वेशात आला अन् रायफल चोरून गेला, पोलिसांकडून शोध मोहीम सुरू

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईच्या नेव्ही नगरमधून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. इथे एका भरलेल्या 'इन्सास रायफलची' चोरी झाली आहे. या रायफलसोबत तीन मॅगझिन आणि ४० जिवंत काडतुसेही गायब झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. त्यानुसार मुंबईत हाय अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे.



ही घटना उघडकीस आल्यानंतर अज्ञात व्यक्ती बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. कफ परेड पोलिस ठाण्यात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस आणि नौदल संयुक्तपणे या अज्ञात व्यक्तीचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे मुंबईच्या संवेदनशील भागात सुरक्षेबाबत मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नेव्हीच्या गणवेशात आलेल्या एका व्यक्तीने ड्युटीवर असलेल्या अग्निवीरला 'तुझी ड्युटी संपली आहे, तू आराम कर' असे सांगितले. त्या व्यक्तीने अग्निवीरच्या हातातील रायफल घेतली. अग्निवीरला त्या व्यक्तीची ओळख नव्हती, मात्र तो नेव्हीच्या अधिकाऱ्याच्या गणवेशात असल्याने त्याला कोणताही संशय आला नाही. परंतु, काही वेळातच ती व्यक्ती रायफल घेऊन पळून गेली. थोड्या वेळात हे अग्निवीराच्या लक्षात आले व त्यांनी तातडीने याची माहिती अधिकाऱ्यांना दिली.

अग्निवीराने दिलेल्या माहितीच्या आधारे नौदल, एटीएस आणि मुंबई पोलिस सतर्क झाले असून या अज्ञात व्यक्तीची शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. कफ परेड पोलिस ठाण्यात या प्रकरणी विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या आरोपीला शोधून काढणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

अधिक ची माहिती अशी की, मुंबईतील नौदलाच्या निवासी भागात ६ सप्टेंबर रोजी रात्री एक रायफल आणि दारुगोळा चोरीला गेल्याची तक्रार करण्यात आली होती. नौदलाच्या गणवेशात आलेल्या एका व्यक्तीने कनिष्ठ जवानाला त्याची ड्यूटी संपली असून तुझ्या जागी आता माझी ड्यूटी असल्याचे सांगितले. त्यानंतर या व्यक्तीने रायफल आणि दारुगोळा चोरत पळ काढला. काही वेळाने कनिष्ठ जवानाच्या ही बाब लक्षात आली व तातडीने त्याने अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. यानंतर नौदलासह मुंबई पोलिस व एटीएस पथक आरोपीचा शोध घेत आहेत.

## देशमुख कुटुंबांचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर तालुक्यातील गोंदेगाव येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कै. रामचंद्र देशमुख यांचे काही दिवसापूर्वी नुकतेच दुःखद निधन झाले. त्याबद्दल सोमवारी सायंकाळीं गोंदेगाव येथील निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी सांत्वन पर भेट दिली. कुटुंबांचे सांत्वन केले.

याप्रसंगी मांजरा साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकआप्पा काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, मांजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड प्रमोद जाधव, मारुतीचे चेअरमन शाम भोसले ,रवींद्र काळे, सचिन दाताळ, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके, मांजराचे संचालक दयानंद बिडवे, गोंदेगावचे सरपंच पांडुरंग देशमुख भागवत देशमुख, अमोल देडे, विश्वनाथ खैरे, भैरवनाथ झाडके हणमंत जगदाळे यांच्यासह ग्रामस्थ इत्यादी उपस्थित होते.

## उच्च शिक्षीत मुले, लाखोंची मालमत्ता तरी वडीलांना फिरावे लागते दारोदारी

■ पत्रकार परिषद घेऊन आत्माराम धनाजी थेटे यांनी मांडली व्यथा

■ प्रॉपर्टीच्या वादातून स्वत:ची मुलेच उठली बापाच्या जीवावर

**लातूर/प्रतिनिधी:** मुलांना लहानाचे मोठे केले, त्यांना उच्च शिक्षण दिले. स्वत:च्या पायावर उभे केले. त्यांचे विवाह करुन दिले. यादरम्यान काबाड कष्ट करुन लाखोंची मालमत्ता, शेती कमवली. मात्र उतार वयात मुलांनीच घरा बाहेर काढलेल्या बापाला दारोदारी फिरुन हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगण्याची वेळ आली आहे. ज्या बापाने लहानाचे मोठे केले त्या बापाला प्रॉपर्टीच्या वादातून मारहाण करण्यापर्यंत मुलांची मजल गेली. यामुळे व्यथित झालेल्या बापाने पोलीस व प्रशासनाकडे दाद मागीतली मात्र न्याय मिळत नसल्याने मुलांनी केलेल्या अन्यायाबाबत आत्माराम धनाजी थेटे यांनी सोमवार (दि.०८) लातूर येथे पत्रकार परिषद घेऊन आपल्याला न्याय द्यावा अशी विनवणी केली आहे.

निलंगा लातूक्यातील तगरखेडा या गावी राहणारे आत्माराम धनाजी थेटे (वय वर्ष ६८) यांनी आपल्या उमेदीच्या काळात अनेक हाल अपेष्टा सहन करत काबाड कष्ट करुन शुन्यातून विश्व निर्माण केले. मुलांना उच्च शिक्षण दिले. त्यांना जिवन जगताना काही त्रास होऊ नये म्हणुन त्यांच्यासाठी पै–पै जमा करत मालमता उभी केली. मात्र हीच मालमत्ता



आपल्या जिवावर उठेल असा विचार मनाला कधी शिवला नव्हता. उच्च शिक्षीत मुलांवर भरवसा ठेऊन आपली सगळी मालमत्ता, शेती, सोने चांदी मुलांना देऊन समाधानी जिवन जगण्याचा विचार केला होता. मात्र पत्नी व दोन मुलांनी अनेक वेळा मारहाण करुन जाच सुरु केला. अशी आपबिती आत्माराम धनाजी थेटे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

उतार वयात मुलांनी सांभाळावे दोन वेळचे जेवण द्यावे अशी अपेक्षा असताना मुलेच आता जिवावर उठली आहेत. मालमत्तेच्या वादातून अनेकदा पत्नी व मुलाकडून मारहान करण्यात आली. लाखोंची मालमत्ता असताना त्यांना किरायाच्या खोलीत रहावे लागत आहे. अपार्टमेंन्ट व फ्लॅट खरेदीसाठी घेतलेले लाखो रुपयांचे कर्जाचे हप्ते व व्याज देणे बाकी असल्याने दररोज देणेकरी तगादा लावत आहेत. असे आत्माराम थेटे यांनी सांगुन आपल्याला विविध आजार आहेत. किरायाच्या घरात राहत असल्याने व उत्पन्नाचे काहीच साधन नसल्याने दवाखाना करण्यासाठी देखील पैसे नाहीत. त्यामुळे मुलांनी आपली प्रॉपर्टी परत करावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

आपल्याच मुलांकडून होणार छळ व अन्याय दुर व्हावा यासाठी त्यांनी पोलीस व प्रशासनाकडे दाद मागितली आहे. मात्र तारीख पे तारीख मिळत असल्याने त्यांना न्याय मिळत नाही. अशा उद्वीगण झालेल्या आत्माराम धनाजी थेटे यांनी पत्रकार परिषद घेत आपली व्यथा प्रसार माध्यमां समोर मांडली. आपल्यावर होणारा अन्याया दूर व्हावा, मुलांपासुन संरक्षण मिळावे व न्याय मिळावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे आत्माराम धनाजी थेटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**आधार ओळखीचा पुरावा, नागरिकत्वाचा नाही- सुप्रीम कोर्ट**

### चिमटा दयाचा



**जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे ११६ रस्त्याची वाट तर लागलीच आहे ! त्याची गुणवत्ता मात्र उघडी पडली आहे !!**

## पोलिसांच्या 'भरोसा सेल' वर हजारो दाम्पत्यांना भरोसा; १०६ जोडप्यांनी समुपदेशनाद्वारे स्वीकारला सुखी-संसाराचा पर्याय

**लातूर/प्रतिनिधी:** पोलिसांच्या 'भरोसा सेल' वर हजारो दाम्पत्यांना भरोसा असून १०६ जोडप्यांनी समुपदेशनाद्वारे स्वीकारला सुखी-संसाराचा पर्याय लाभला आहे. कौटुंबिक हिंसाचार, किरकोळ वाद- विवाद आणि मतभेद यासह अनेक कारणांमुळे गेल्या काही वर्षांत घटस्फोट घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लग्नानंतर पती- पत्नीचे निर्माण झालेले वैध वैवाहिक संबंध कायदेशीररित्या तोडण्याची प्रक्रिया म्हणजे घटस्फोट होय. घटस्फोटामुळे वैवाहिक संबंध तोडण्याचे स्वतंत्र मिळाले असले, तरी त्यामुळे अनेक बिकट समस्या देखील निर्माण होतात. यात प्रामुख्याने या दांपत्याच्या अपत्यांची हेळसांड होते. ही वाढती समस्या जर प्राथमिक स्तरावरचं सोडवली गेली, तर भविष्यात घटस्फोटांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. याच उद्देशाने पोलिसांनी काही वर्षांपूर्वी भरोसा कक्षाची स्थापना केली होती. आज या भरोसा कक्षामुळे दरवर्षी शेकडो कुटुंब आपसातले वादविवाद आणि मदभेद विसरून पुन्हा नव्याने संसारात रमले आहेत.

घटस्फोटाची मुख्यत्वे कारणे पुढील प्रमाणे आहेत

गेल्या काही वर्षांमध्ये अगदी लहान-लहान विषयांवरून काडीमोड (घटस्फोट) घेण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रेमविवाहात तर हे प्रमाण जरा जास्तचं दिसून येते. त्यामुळे घटस्फोट हा शब्द किती स्फोटक असतो, याची कल्पना घटस्फोट घेतलेल्या दाम्पत्यांना नक्की आली असेल. हल्ली तर मोबाईल, सोशल मीडिया या सारख्या विषयांना कारणीभूत धरून देखील घटस्फोट मागितले जात आहेत. याशिवाय कौटुंबिक हिंसाचार, हुंडा, मानसिक छळ, व्यसनाधीनता आणि लहान- लहान वादविवाद वरून सुद्धा घटस्फोटाचे अर्ज सादर केले जात आहेत. घटस्फोटाची वाढते प्रमाण ही आपल्या समाजासाठी एक गंभीर समस्या बनलेली आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा काही समस्यांवर प्राथमिक स्वरूपाचा तोडगा काढण्याकरिता गेल्या काही वर्षांपूर्वी भरोसा कक्षाची स्थापना केली आहे.

भरोसा कक्षाकडे दर महिन्याला साधारणतः ६०ते ७० प्रकरणे तक्रार स्वरूपात येत आहेत. यामध्ये कौटुंबिक वाद- विवाद पती- पत्नीचे भांडण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर आधारित तक्रारी सर्वाधिक येतात. चालू वर्षाच्या ८ महिन्यात भरोसा कक्षाकडे ५४७ प्रकरणे दाखल झाली असून त्यापैकी ४१९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. यामध्ये १०६ प्रकरणांमध्ये समेट घडवून आणण्यात भरोसा कक्षाला मोठं यश प्राप्त झालेला आहे.




पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात भरोसा सेल प्रभारी अधिकारी महिला पोउपनी श्रीमती शामल देशमुख समुपदेशन करिता पोउपनी संजय भोसले, महिला पोलिस अंमलदार मीरा सोळंके, मीना पवार यांनी मेहनत घेतली आहे.

# ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर

**लातूर/प्रतिनिधी :** सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाभरातील पावणे दोनशेंहून अधिक कर्मचारी बांधव - भगिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव बेडगे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातून अशा प्रकारचे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले. राज्यातील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या ४० टक्के अनुदान वाढीचा शासन निर्णय लवकरात लवकर निघावा, ग्रंथालयाचे दर्जा / वर्ग बदल करण्यात यावेत, ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये काल सुसंगत सुधारणा करण्यात यावी. ग्रंथालय कर्मचारी यांचे काम सहा तास ऐवजी आठ तास करण्यात यावे. ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचारी यांना शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी लागू करावी किंवा किमान वेतन दरमहा त्यांच्या खात्यावर जमा करावे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणे शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी यांना सेवाशर्ती नियमावली लागू करणे, ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करावी, विमा हॉस्पिटलच्या माध्यमातून ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सेवेचा लाभ मिळावा, ग्रंथालय कर्मचाऱ्यांना असंघटित कामगारांचा दर्जा द्यावा आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सचिव - उपसचिव उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठविण्यात आले. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी हे निवेदन स्वीकारले.

याप्रसंगी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे ज्येष्ठ मार्गदर्शक एल.बी. आवाळे गुरुजी, सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते, लातूर जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, उपाध्यक्ष सूर्यकांत जाधव, सौ. वैशाली दुरुगकर , सचिव संतोष



करमले, सहसचिव सौ. नागेश्वरी पांचाळ, गुप्तलिंग स्वामी, कोषाध्यक्ष विद्यासागर गायकवाड, अशोक खोडवे, काशिनाथ बोडके, हणमंत भवाळ, गोविंद पाटील, विलास नागरगोजे, गिरीधर जंगाले, सोपान सूर्यवंशी, शिवहार बिराजदार, मनिषा भिसे, नागनाथ नागरगोजे, रेहान सय्यद, निवृत्ती सूर्यवंशी, अजेयसिंह चव्हाण, अमरसिंह चव्हाण, सुनील पाटील, कृष्णा पिंजरे, गोविंद मुंडे, नागनाथ बिराजदार, नवनाथ शिंदे, सौ. सौ. मंगल बावगे, सौ. माधुरी बावगे, अंजु भोगावकर, ज्योती सावरगावे, सास्वती कांबळे, ज्योती गस्तगार, रेखा गायकवाड, अनिता लांडगे, कौशल्या तुडमे, पल्लवी काळे, सुमित्रा स्वामी, प्रतिभा घोगरे, मीना चव्हाण, मीना गंदगे, फरजाना पठाण, सुनंदा पोतदार, जयश्री बगडे, मुक्ता गुट्टे, रंजना माने, बालिका बिराजदार, छाया मोरे यांसह जिल्हाभरातील पावणे दोनशेंहून अधिक ग्रंथालय कर्मचारी बांधव - भगिनींची उपस्थिती होती.

## विश्वेश्वरय्या ज्यूनियर कॉलेज मध्ये नवप्रवेशित विद्यार्थांसाठी स्वागत समारंभ -सिध्दी पाठक मिस फ्रेशर २०२५-२६




**लातूर/प्रतिनिधी :** विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल (ज्युनियर कॉलेज), लातूर येथे अकरावीच्या वर्गांचे शुभारंभ झाले असून नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कला व गुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत सिद्धी पाठक हिने उत्कृष्ट कामगिरी करत मिस फ्रेशर २०२५-२६ हा मान मिळविला. तिचा सत्कार करून हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# चाकुरच्या मागासवर्गीय वस्तीगृहाचा बुधवारी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन समारंभ

**चाकूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवासासाठी राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून चाकूर तालुक्यातील हनमंतवाडी येथे मागासवर्गीय मुला मुलींच्या वस्तीगृहाच्या ३० कोटी रुपयांच्या इमारतीचा भूमिपूजन सोहळा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते दि. १० सप्टेंबर बुधवारी सकाळी १०:०० वाजता हनमंतवाडी येथे संपन्न होणार आहे. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे असणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून लातूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य पद्माकर पाटील, चाकूरचे नगराध्यक्ष करीम गुळवे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख गोपाळ माने, नगरसेवक मिलिंद महालिंगे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, नगरसेवक विलासराव पाटील, भाजप तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, झरीचे सरपंच प्रतिनिधी दयानंद सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक राहुल सुरवसे, गोविंद भोरे, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष भानुदास पोटे, चापोलीचे उपसरपंच निसार देशमुख, नगरसेवक मुज्जमिल सय्यद, अभिमन्यू धोंडगे,भागवत फुले, इलियास सय्यद शिवदर्शन स्वामी, नितीन रेड्डी, मोहम्मद सय्यद, राम कसबे, संजय पाटील, पपन कांबळे,नरसिंग गोलावार, माजी उपसरपंच मूर्तुजा सय्यद,शिवाजीराव माने, अर्जुन मद्रेवार, खंडेराव वाघ संदीप शेटे,रणजीत पाटील,सूर्यकांत चव्हाण, गणपतराव कवठे, गणपतराव नितळे, सिद्धेश्वर लोहारे सिद्धेश्वर अंकलकोटे, शेषराव मुंजाने, विष्णू तीकटे,शिवशंकर हाळे, विवेक शिंदे,परमेश्वर नवगण,विश्वनाथ एडके, अशोकराव पाटील,मच्छिंद्र नागरगोजे,निलेश भंडे, अंतेश्वर पाटील, भागवत कुसंगे, जगन्नाथ आयनुले, मधुकर मुंडे, मार्शल माने महेश व्हत्ते, बाबुभाई

दापकेवाले,समाधान डोंगरे, मन्मथ पालापुरे,बिलाल पठाण सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन हनमंतवाडी-तीर्थवाडी येथील सरपंच हनमंत नरवटे व उपसरपंच राजकुमार शेटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लातूर डेपोची चिकलठाणा बस खरोळ्यापर्यंत; औसा आगाराची मळवटी-कासारखेडा बसही वेळेवर सुरु केल्याने दिले धन्यवाद

**लातूर/प्रतिनिधी :** खरोळा ग्रामस्थांच्या मागणीनुसार लातूर आगाराची ४.३० वाजताची चिकलठाणा बस आता थेट खरोळ्यापर्यंत धावणार आहे. त्याचबरोबर औसा आगाराची मळवटी-कासारखेडा मार्गावरील बसही वेळेवर सोडली जाणार असल्याने प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विभाग नियंत्रक अश्वजीत जानराव (DC) यांच्या तत्पर कार्यवाहीमुळे ही सुविधा शक्य झाली असून ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत. खरोळा नागरिकांची ही मागणी मान्य केल्याने त्यांनी आभार मानले असून आगामी आंदोलन स्थगित केले आहे. गाव तेथे एसटी बस असे ब्रिद असताना चालू बस बंद केल्याने नागरिकांत नाराजी निर्माण झाली होती. गावकऱ्यांनी रितसर मागणी करताना पुन्हा बस सुरू केल्याने अबाळवृद्धांना दिलाास मिळाला आहे. विद्यार्थी लातूरला मोठ्या संख्येने येतात. या बसमुळे एसटीला चांगले उत्पन्न मिळते. बस ही भरून जा-ये करीत आहे. पुन्हा बस चालू केल्या बाबत अनेकांची अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात

# ३७ जागांसाठी होणार शिकाऊ उमेदवारांची भरती

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात सन २०२५-२६ या सत्रासाठी शिकाऊ उमेदवार (प्रशिक्षणार्थी) म्हणून ३७ जागांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामध्ये यांत्रिक मोटारगाडी (२१ जागा), मोटारगाडी साठा जोडारी (७ जागा), ऑटो इलेक्ट्रीकल तथा इलेक्ट्रिशियन (३ जागा), सांधाता-वेल्डर (१ जागा), रंगकामगार (१६ जागा) आणि मेकॅनिक रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनर (२ जागा) या व्यावसायिक पदांचा समावेश आहे.

पात्र उमेदवारांनी दहावी उत्तीर्ण, आय.टी.आय. (एनसीव्हीटी) किंवा विविध व्यवसायात व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. यांत्रिक प्रवर्गातील अभियांत्रिकी पदवीधर/ पदविकाधारकांसाठी २ जागा राखीव आहेत. आय.टी.आय. उत्तीर्ण उमेदवारांनी www.apprenticeshipindia.gov.in. या पोर्टलवर, तर अभियांत्रिकी पदवीधरांनी www.nats.education.gov.in या पोर्टलवर ११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ लातूर विभागाच्या आस्थापना क्रमांक (११७२७००४६१) साठी अर्ज करावा.

ऑनलाइन नोंदणीनंतर, उमेदवारांनी लातूर विभागीय कार्यालय येथे २२ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत छापील अर्ज सादर करावेत. अर्ज शुल्क खुल्या प्रवर्गासाठी ५९० रुपये आणि मागासवर्गीयांसाठी २९५ रुपये आहे, जे धनाकर्ष किंवा आय.पी.ओ.द्वारे सादर करावे. अर्ज कार्यालयात शनिवार व सुट्टीचे दिवस वगळून स्वीकारले जातील. २० सप्टेंबर २०२५ नंतर ऑनलाइन नोंदणी केलेले अर्ज रद्द होतील. २७ सप्टेंबर २०२५ (दुपारी ३ वाजेपर्यंत) छापील अर्ज सादर न केल्यास उमेदवारीसाठी विचार केला जाणार नाही. यापूर्वी शिकाऊ उमेदवारी केलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये. अधिक माहितीसाठी, उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागीय कार्यालय, जुना रेणापूर नाका, अंबेजोगाई रोड, लातूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्याच्या युवा धोरण समितीत लातूरच्या विधी पळसापुरे यांची वर्णी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी समिती गठीत केली असून या समितीत राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त विशेषतः लातूरच्या कन्या विधी सुभाष पळसापुरे यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे त्या समितीतील सर्वात युवा सदस्य ठरल्या आहेत.



राज्यातील युवकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे समाधान, त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक दिशा आणि शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी युवा धोरण महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या समितीचे कार्य अत्यंत जबाबदारीचे असून युवकांच्या भविष्यास दिशा देणारे आहे. बदलत्या काळातील आव्हानांचा विचार करून शिक्षण, रोजगार, क्रीडा, संस्कृती, सामाजिक सहभाग आणि उद्योजकता यांसारख्या विविध क्षेत्रांत युवा धोरणाचा आराखडा तयार करण्याचे काम ही समिती करणार आहे.

विधी पळसापुरे या मागील पाच वर्षांपासून युवक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाकडून त्यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या संसदेत केलेल्या प्रभावी भाषणाने लाखो लोकांची मने जिंकली होती. त्यामुळे त्यांचा या समितीतील समावेश हा केवळ सन्मानच नव्हे, तर युवकांचा खरा आवाज या समितीत पोहोचेल, अशी खात्री दिलासा देणारी ठरते.

लातूरपासून सुरू झालेला प्रवास थेट दिल्लीपर्यंत पोहचला आणि दिल्लीतून सुरू झालेला प्रवास आज देशभर पसरला आहे. दिसायला सोपा वाटणारा हा प्रवास प्रत्यक्षात मेहनत, संघर्ष आणि जिद्दीने सजलेला आहे. वाचन, लेखन आणि प्रभावी वक्तृत्व यांचा मिलाफ झाल्यावर एखादी व्यक्ती किती उंच भरारी घेऊ शकते याचे जिवंत उदाहरण म्हणजे विधी पळसापुरे, आपल्या बुलंद आवाजातून संसद गाजवणाऱ्या आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विधीने अगदी कमी वयात राष्ट्रीय युवा पुरस्कार पटकावला. तिच्या कविता, भाषणं आणि लिखाण हे सोशल मीडियावर हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.यश म्हणजे फक्त स्वतःचं करिअर घडवणं नसून, अनेकांना मार्ग दाखवणं, प्रेरणा देणं आणि समाजासाठी काहीतरी घडवणं हेच खरं यश आहे. आणि याच प्रवासाचा पुढचा टप्पा म्हणजेच महाराष्ट्र सरकारच्या सुधारित युवा धोरण समितीत सर्वात युवा सदस्य म्हणून त्यांची झालेली निवड.गल्लीपासून दिल्लीपर्यंत नाव पोहोचलेली ही तरुणी आता राज्याच्या धोरणनिर्मितीत आपला ठसा उमटवणार आहे. त्यामुळे तिच्या पुढील वाटचालीकडून अजून मोठ्या शिखरांच्या अपेक्षा बाळगल्या जात आहेत.

## लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे १० सप्टेंबर रोजी नौदल सैन्य मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** मुंबई येथील नौदल अधिकारी १० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे उपस्थित राहून जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबीत यांच्या अडीअडचणी जाणून घेणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबीत यांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## पक्ष श्राध्दपक्ष ..

पक्ष पंधरवडा चालू
जाणून घ्यावी प्रथा
धर्मामागले जेशास्त्र
समजून घ्यावीकथा

भयापोटी पूजाअर्चा
चित्र विचीत्र रे व्यथा
छळ करतात पितर
व्यर्थ अंधश्रद्धा वृथा

शास्त्रोक्त मंत्रोच्चांरा
दर्वळो विधी सुचिता
निमीत्ताने दानकरता
वाढवी पुण्य संचिता

लुटणारे जागो जागी
सांगूनि प्रकांड कथा
शास्त्र उगाचं बदनाम
चर्वण करतोयं चोथा

भरकटून टाकलाहेतू
ज्ञानज्यांचे यथा तथा
धर्मनावाचा आडोसा
सांगेउगा गोवळगाथा

श्रद्धाभाव होविश्वासे
पाखांडियाहि आस्था
समाधान प्राप्तचित्ता
शांतता ती अस्वस्था

शुचिर्भूत रे अंतर्बाह्य
सहज जपा पवित्रता
एकत्रित परिवारजन
जुळे सांघिक मित्रता

पितरांच्या आशिर्वादे
कुलोध्दारार्थ संहिता
नाव जरी रे पितरांचे
करी सारेआपलेहिता

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एनईपी सेन्सिटायझेशन कार्यशाळा संपन्न

## मध्यप्रदेश येथील डॉ. आर.टी. बेद्रे यांनी केले मार्गदर्शन

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) यांच्या वतीने एनईपी सेन्सिटायझेशन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन ३ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. यावेळी मध्यप्रदेश येथील सागर जिल्ह्यातील डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. आर.टी. बेद्रे यांनी उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.



कार्यशाळेचे उदघाटन दयानंद शिक्षण संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य विशाल अग्रवाल यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयोजक तथा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. बेद्रे म्हणाले, नवीन शिक्षण धोरण याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. या धोरणात अनेक नव्या गोष्टी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. थेअरी पेक्षा प्रात्यक्षिक शिक्षणावर अधिक भर दिला जातो आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आकांक्षा भांजी यांनी तर शेवटी आभार प्रा. सुहाना शेख यांनी मानले.


मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना क्रमांक: SUR/TD/T/2025/24S

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. निविदा क्रमांक. SUR/TD/T/2025/24S कामाचे नाव: सोलापूर विभागातील लातूर, उस्मानाबाद, बार्शी टाउन, पंढरपूर, सांगोला आणि सुलगरे डेपो येथील ट्रॅक्शन सबस्टेशन्स (TSS) चे व्यवस्थापन आणि सेक्शनिंग पोस्ट (SP) आणि सबसेक्शनिंग आणि पॅरलिंग पोस्ट (SSP) चे आपत्कालीन व्यवस्थापन ०२ वर्षांच्या कालावधीसाठी. **अंदाजे खर्च:** रु. १,२४,६५,४१२.३४/- **बोली सुरक्षा** रु. २,१२,३००/- **काम पूर्णता कालावधी:** २४ महिने, **ऑफरची वैधता:** ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ३०.०९.२०२५ रोजी १५:०० वाजता.



टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६